नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०६/०१/२०२६ (मंगळवार )**

---

# कळमेश्वर पोलीसांनी गुन्हेगारांचे कृत्यांवर आळा घालण्याकरिता गुन्हेगारांवर केलेल्या कठोर व प्रभावी कारवाई तसेच प्रतिबंधक कारवाई बाबत...

दिनांक ०२/०१/२०२६ चे एका वृत्तपत्रात कळमेश्वर तालुक्यातील वाढत्या गुन्हेगारीचे पोलीसांसमोर आव्हान अशा शिर्षकाखाली बातमी प्रसीध्दी झाली आहे. या वृत्तामध्ये सन २०२५ दोन खुन, गोळीबार, गुरांची तस्करी, निवडणुक काळात मारहाण, अंमली पदार्थ गांजा व एमडी पावडर विक्री यासारखे गुन्हे झाल्याबाबत नमुद आहे. सदर प्रकरणाची सविस्तर माहिती अशी आहे की, पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे दोन खुनाच्या घटना घडल्या असून सदर घटना हया पारिवारीक वादातून घडलेल्या असून **सदर गुन्हयांमधील आरोपींचा पुर्वीचा कोणताही गुन्हेगारी रेकॉर्ड नाही**. नमुद आरोपीतांना २४ तासाचे आत अटक करून गुन्हयात वापरलेले हत्यार जप्ती केले असून सध्या ते कारागृहामध्ये बंद आहेत.

नगर परिषद निवडणुक प्रचार काळामध्ये आरिफ लतीफ शेख याला हरिष ग्वालवंशी व त्याचे साथीदारांनी त्याचे अपहरण करून मारहाण केल्याचे प्रकरणामध्ये अपहरण व खुनाचा प्रयत्नाचे कलमान्वये गुन्हा नोंद करून ०६ आरोपीतांना अटक करण्यात आले असून ते सध्या मध्यवर्ती कारागृह नागपूर येथे बंद आहेत. **सदर प्रकरणात नागपूर शहरातील आरोपीतांनी कळमेश्वर मध्ये येवून गुन्हा केला . नमुद आरोपीतांवर महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (MCOCA) कायदयान्वये कार्यवाही करण्यात आली आहे. यापुर्वी सुध्दा गुन्हयातील मुख्य आरोपी हरिष ग्वालवंशी याचे वर ११० (इ) (ग) फौ.प्र.सं अन्वये कारवाई केलेली आहे.**

माहे नोव्हेंबर २०२५ मध्ये नागपूर शहरात होणा—या गोवंश तस्करीचे संबधाने गोवंश तस्करीची घटना घडली असून सदर प्रकरणातील एकुण ०७ आरोपीतांना निष्पन्न केले. **गोंवश तस्करी ही नागूपर शहरातील असून मुख्य आरोपी हे नागपूर चे आहेत.** सदर गुन्हयाचा सखोल तपास करून साखळी पुरावे जोडुन आरोपी हे संघटीतरित्या गुन्हेगारी करतात हे निष्पन्न करून **नमुद आरोपीतांवर महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (MCOCA) कायदयान्वये कार्यवाही करण्यात आली आहे.**

मौजा शंकरपट येथे गोळीबार झाला होता. सदर घटना ही सुद्धा नातेवाईकांमध्येच घडलेली असून सदर घटने संबंधाने गैरकायद्याची मंडळी जमवून खुनाचा प्रयत्न करणे या कलमान्वये गुन्हा नोंद करून एकुण १३ आरोपीतांना अटक करण्यात आले. **त्यांचेवरसुद्धा एमपीडीए व हददपार सारखी प्रभावी प्रतिबंधक कार्यवाही प्रस्तावीत आहे.**

अंमलीपदार्थ गांजा व एमडी विक्री करणाऱ्यांविरूद्ध एनडीपीएस कायदया अंतर्गत गंभीर कलमान्वये गुन्हे नोंद करून आरोपीतांना गुन्हयांमध्ये अटक करण्यात आली असून ते कारागृहात बंद आहेत. आरोपीतांविरूद्ध एमपीडीए व हददपार कायदयांअंतर्गत प्रतिबंधक कठोर कार्यवाही करण्यात आली आहे. **तसेच वारंवार गुन्हे करणारे एकुण २८ गुन्हेगारांविरूद्ध मकोका, एमपीडीए, मपोका कायदयान्वये कठोर प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आलेली आहे.**

**कळमेश्वर पोलीसांनी हददीतील गुन्हेगारांचे कृत्यांवर आळा घालण्याकरिता गुन्हेगारांवर कठोर व प्रभावी कारवाई तसेच प्रतिबंधक कारवाई केलेली आहे.**

## दुखापत करून जबरी चोरी कारणारा आरोपी अटक
## स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा :—** पोलीस स्टेशन मौदा अंतर्गत दिनांक ०३/०१/२०२६ रोजी मौजा गुमथाळा शिवार हल्दीराम ते परसाळ जाणारा रोड येथे फिर्यादी जगदीश गुरूप्रसाद पंधराम, वय २६ वर्ष, रा. ग्रा. लेहगडवा ता. तामीया जि. छिंदवाडा, रा. मध्यप्रदेश ह.मु. पुनम हाउस, गुमथाळा, ता. कामठी हा आपली सेकंड शिफट करून पायदळ गुमथाळा जात असता रात्री अंदाजे १२.१५ वा दरम्यान तीन अज्ञात आरोपीतांनी काळया रंगाचे मोपेड गाडीवर ट्रिपलसीटने येवुन फिर्यादीचे खिश्यातुन जबरीने दोन हजार रूपये काढले तसेच मोबाईल सुध्दा मागत होते फिर्यादीने देण्यास नकार दिला असता गाडीवर मागे बसलेल्या इसमाने खिश्यातुन चाकु काढला व फिर्यादीला चाकु मारून जखमी केले व फिर्यादीचे मोबाईल व

पैसे जबरीने हिसकावुन आपल्या मोपेड गाडीने पळुन गेले. अशा फिर्यादीच्या रीपोर्ट वरून पोलीस स्टेशन मौदा कलम ३०९(६), ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद केला होता.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात सदर गुन्ह्याचे समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांनी सुरू केला. नमुद पथकाने गुप्तबातमीदारांच्या माहीतीच्या आणि तांत्रिक पुराव्यांच्या अधारे दिनांक ०५/०१/२०२६ रोजी **आरोपी नामे आदिल उर्फ अद्दू इमरान खान, वय १९ वर्ष, रा. ताजबाग नागपूर** यास मोठा ताजबाग, नागपूर येथुन ताब्यात घेवुन नमुद आरोपीकडे सखोल आणि कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्याने त्याच्या दोन साथीदारासह सदरचा गुन्हा केल्याबाबत कबुली दिली. पोलीसांनी नमुद आरोपीकडुन एक कीपॅड मोबाईल जप्त केला आहे. **आरोपीला अटक करण्यात आली आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०२ गुन्हे नोंद २ दुचाकी आणि रोख रक्कमेसह १ लाख ८३ हजारांचा मुद्देमाल जप्त काटोल पोलीसांची कामगिरी

दिनांक ०५/०१/२०२६ रोजी काटोल पोलीसांना अवैध जुगाराबाबत मिळालेल्या माहीतीच्या आधारे, पठार शिवर परिसरात अवैधरित्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांवर दोन ठिकाणी छापा टाकुन दुचाकी वाहने, ५२ ताशपत्ते व रोख रक्कम असा एकुण **१,८३,८५०/—**रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

**कारवाई क्रं १ :—** पठार शिवारात आरोपी १) नितेश जिवन कुमेरिया, रा.खानगाव, ता. काटोल २)योगेश राजेन्द्र खरोले, रा. पंचवटी, काटोल, ३) नामे धिरज विजय सिंग, रा. सरस्वती नगर, काटोल हे अवैधरित्या ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळतांना मिळुन आले. नमुद आरोपीतांच्या ताब्यातुन १) ०२ मोबाईल, २) मोपेड अॅक्टीव्हा क्र. एम.एच ४० डी.ए . ८०४५ कि ८५,०००/— रूपये ३) रोख रक्कम ३६००/— रूपये ४) ५२ तासपत्ते असा एकुण किंमती १,१७,६००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**कारवाई क्रं २ :—** पठार शिवारात रोड च्या कडेला आरोपी १) धम्मशीर पुरूषोत्तम गायकवाड ,रा. पेठबुधवार, काटोल, २) तन्मय राजकुमार चौधरी, रा. तळयाची पार, काटोल,३) गोपी तायडे, रा. अण्णाभाउ साठे नगर, काटोल हे अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आले. नमुद आरोपीतांच्या ताब्यातुन १) मोबाईल २३,००० /—

रूपये, २) डीस्कव्हर मो.सा क्र एम.एच ४० व्ही. ४१५६ कि ४०,००० /— रूपये ३) रोख रक्कम ३,२५०/— रूपये,आणि ४) ५२ तासपत्ते असा एकुण किंमती ६६,२५०/— रूपयांचा मुद्‌देमाल जप्त केला आहे.

**दोन्ही कारवाईत २ दुचाकी, रोख रक्कम ६,८५०/— रूपये आणि साहीत्य असा एकुण १,८३,८५०/— रूपयांचा मुद्‌देमाल जप्त केला. वर नमुद आरोपीतांवर महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये एकुण ०२ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.**

## नागपूर ग्रामीण जिल्हयात साजरा करण्यात येत आहे 'रेझिंग डे' सप्ताह

**२ जानेवारी हा दिवस महाराष्ट्र राज्य पोलिस दलाच्या स्थापनेचा वर्धापन दिन म्हणून साजरा केला जातो. महाराष्ट्र सरकारने हा दिवस अधिकृतरित्या पोलिस रेझिंग डे म्हणून घोषित केला असून, दिनांक ०२ ते ०८ जानेवारी पर्यंत रेझिंग डे सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. आज दिनांक ०६/०१/२०२६ रोजी रेझिंग डे' सप्तहा अंतर्गत नागपूर ग्रामिण पोलीस दलातर्फे विविध उपक्रम घेण्यात आले आहे.**

### पोलीस बँड पथकाचे विशेष प्रदर्शन

पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत देवरावजी इटनकर, पब्लीक स्कुल आणि ज्युनियर कॉलेज येथे महाराष्ट्र पोलीस दलाच्या स्थापना दिनानिमित्त (रेझिंग डे) नागपूर ग्रामीण पोलीस दलातर्फे पोलीस बँड पथकाचे विशेष प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. हे प्रदर्शन विदयार्थ्यांना आणि नागरिकांना पोलीस दलाच्या विविध विभागांची ओळख करून देण्याच्या उद्देशाने साजरे होत आहे. या प्रदर्शनात पोलीस बँड पथकाने आकर्षक वादन करून देशभक्तीपर गित तसेच ईतर गित सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

### विदयार्थ्यांना मार्गदर्शन

पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी अंतर्गत जिल्हा परीषद हायस्कुल, किरमीटी भारकस विदयालय येथे, पोलीस स्टेशन बेला अंतर्गत लोकजीवन विदयालय येथे, पोलीस स्टेशन रामटेक साई इंटरनॅशनल स्कुल येथे रेझिंग डे निमित्यांने शाळांना भेट देवुन शालेय विदयार्थ्यांना गुड टच बॅड टच, वाहतुक नियम, सोशल मिडीया चा वापर,सायबर गुन्हयांबाबत माहीती, डायल ११२ माहीती देवुन जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.तसेच पोलीस स्टेशन बेला अंतर्गत लोकजीवन विदयालयचे विद्यार्थ्यी आणि पोलीस यांनी प्रभात काढली. प्रभातफेरी दरम्यान सुध्दा नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली. विदयार्थ्यांना पोलीस स्टेशन बेला येथील कामकाजाबाबत माहीती, पोलीस स्टेशन अंतर्गत विविध शाखांबाबत माहीती तसेच कार्यपद्धती समजावून सांगितली.




SAI INTERNATIONAL SCHOOL
(ENGLISH MEDIUM CBSE PATTERN)
Principal Office


आदर्श गुण
रस्ता सुरक्षा
अभियान-२०
महाराष्ट्र पोलीस
स्थापना दिवस
सप्ताह सोहळा व जनजागृती कार्यक्रम
पोलीस स्टेशन, MIDC बुटीबोरी
MAHARASHTRA POLICE
RAISING DAY
Week Celebration & Awareness
Program-2026




## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७२० रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ०६/०१/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७२० आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुटिबोरी येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३४ आरोपी अशा एकुण ९६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३८ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २६ आणि पोलीस

स्टेशन वेलतुर ३१ आरोपी अशा एकुण १२७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३७ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३८ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३२ आरोपी अशा एकुण १३६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३४ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २८ आरोपी अशा एकुण ६२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ४८ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३७ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २५ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २५ आरोपी अशा एकुण १३५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ५७ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ५१ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे २७ आरोपी अशा एकुण १६४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन येथे एकुण ७२० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**








मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने